IX

Abhishek International School ★ Reg. No. F-19149/Pune DL 18-10-2003 Moshi, Pradhikaran ★

स्वयंअर्थसहाय्यित शाळा

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/१८/२०१६
पुणे १ दिनांकः- ०८/०१/२०१६

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
अभिषेक विद्यालयम संचलित
अभिषेक इंटरनॅशनल स्कुल, प्लॉट नं. २, सेक्टर ६,
मोशी प्राधिकरण, पुणे

**विषय :-**बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ याचा नियम११, पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

आपला दि. २३/१०/२०१५ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळांशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे.

**मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे** दिनांक **१ जून २०१५** पासून दिनांक **३१ मार्च २०१८** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता १ ली ते ८ वी** करिता **अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक अभिषेक विद्यालयम संचलित अभिषेक इंटरनॅशनल स्कुल, प्लॉट नं. २, सेक्टर ६, मोशी प्राधिकरण, पुणे** *या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.*

***वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या* अधीन आहे. :-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) शाळा पालन करील.

३. शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५. संस्था/शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा त्याच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात, किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

**७.** **(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

**(दोन)** कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

**(तीन)** कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

**(चार)** प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

**(पाच)** विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

**(सहा)** अधिनियमाच्या कलम २३(१) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

**(सात)** अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि

**(आठ)** शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करेल.

Abhishek International School ★ Reg. No. F-19149/Pune DL 18-10-2003 Moshi, Pradhikaran ★
Principal
Abhishek International School Plot No. 2, Sect. No.6, Moshi, Pradhikaran, Pune.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०.शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्येविनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ. :- १ एकर
- एकूण बांधकामाचे क्षेत्र. :- ६७५ चौ. मी.
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ :- ३३२५ चौ. मी.
- वर्ग खोल्यांची संख्या. :-०५
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली. :- ०३
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत काय ? :-

| | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| संडास/मुतान्या | १/१ | १/१ | २/२ |

- पिण्याच्या पाण्याची सुविधा. :- आहे.
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर. :- लागू नाही .
- अध्यापन अध्ययन साहित्य /खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता. :- आहे.

११. वाचन साहित्य विनासायास उपलब्ध.:- आहे.

१२. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१३. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१४.शाळा सोसायटी नोंदणी नियम १८६०(१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विवस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१५.शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१६.शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

१७. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक प्राथतेउच्च माध्य/स्वयंअस/ई/सी.बी.एस.ई./पीसीएमसी/१८/२०१५-१६ असा आहे. तसेच आपल्या शाळेचा **U-DISE No.** हा आहे. या कार्यालयाशी कोणताही *पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा याची नोंद घ्यावी.*

१८. मा. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१९. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.
जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

Abhishek International School ★ Moshi, Pradhikaran ★ Reg. No. F-19149/Pune DL 15-10-2003

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
(जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/१८ /१६)
पुणे १ दिनांक :- ८/०१/२०१६

2

Abhishek International School
Reg. No. F-19149/Pune DL 18-10-2003
Moshi, Pradhikaran

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
अभिषेक विद्यालयम संचलित
अभिषेक इंटरनॅशनल स्कुल, प्लॉट नं. २, सेक्टर ६,
मोशी प्राधिकरण, पुणे

विषयः- सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भः- १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण (क्र. १ ,६ व २४) २०१२.
२) म. शासनाचे शालेयक शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. नाहप्र-२००९/(६६३/०९) माशि-१, दि. २० जुन २०१२
३) शासन निर्णय एमएफएम-२०१४/प्र.क्र.१७०/एमएम-२ शालेय शिक्षण क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि. २.०६.२०१५.
४) मा.शिक्षणउपसंचालक, पुणेविभाग, पुणे यांचेकडील आदेशक्र. शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/१५५७८/ ८१/मान्यता /पुवि/१५ दि.३० जुन २०१५.

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार नविन शाळा स्थापन करणेकरिता /विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करण्याकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुळ यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | सुरु असलेल्या वर्गासहीत | शाळा सुरु केल्याचा दिनांक | नविन शाळा/ दर्जा वाढ | शाळेचा प्रकार (प्राथमिक/उच्च प्राथमिक) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ७ | ८ | ९ |
| १ | १६६ | अभिषेक विद्यालयम मोशी प्राधिकरण, पुणे | अभिषेक इंटरनॅशनल स्कुल, प्लॉट नं. २, सेक्टर ६, मोशी प्राधिकरण, पुणे | इंग्रजी | इ. १ ली ते ८ वी | जून २०१५ पासून | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक |

## अटी व शर्ती

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०४ अन्वये सन २०१५-१६ मध्ये सुरु असलेल्या वर्गासह परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
१. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
३. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
४. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.
५. शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका, पुणे-५.

F:15 pratidnypatr/pmc/self finance prathmik

[Type text]

Principal
Abhishek International School
School Plot No. 2, Sect. No.6,
Pradhikaran, Pune.

Abhishek International School
Reg. No. F-19149/Pune DL 18-10-2003
Moshi, Pradhikaran